पुणे TODAY सकाळ
शुक्रवार
२१ जुलै २०१७
पाऊस
27.2°/22

# आयुर्वेदात अधिक संशोधनाची गरज : डॉ. अरुण जामकर

**पुणे, ता. २० :** ''आयुर्वेद हे भारतीय परंपरेने दिलेले शास्त्र आहे. त्याला तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड मिळाल्यास त्यामध्ये सुपरस्पेशालिटी येऊ शकते. त्यासाठी आयुर्वेदात अधिकाधिक संशोधन झाले पाहिजे,'' असे मत 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठा'चे माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांनी व्यक्त केले.

'आरोग्यवर्धिनी चिकित्सालय' आणि 'बीव्हीजी इंडिया'च्या 'केशायुर्वेद केंद्राच्या वर्धापनदिनी आयोजिलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून' पुस्तकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आला. 'बीव्हीजी इंडिया'चे संचालक दत्ता गायकवाड, संचालिका वैशाली गायकवाड, स्वप्नाली गायकवाड, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सतीश डुंबरे, राज्याच्या आयुष विभागाच्या सहायक संचालिका डॉ. सरिता गायकवाड, मंदार जोगळेकर, हरीश पाटणकर उपस्थित होते. या वेळी असोसिएशन ऑफ कॉस्मेटॉलॉजी, ट्रायकोलॉजी अँड टेक्नॉलॉजीची स्थापना करण्यात आली.

जोगळेकर म्हणाले, ''आयुर्वेदामध्ये शास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन होत आहे, ही जमेची बाजू आहे. आपले मूळशास्त्र असलेले आयुर्वेद जगभर पोचले पाहिजे.'' डॉ. सरिता गायकवाड म्हणाल्या, ''आयुर्वेदात क्षमता असूनही ते एक शास्त्र असल्याचे वारंवार सिद्ध करावे लागत आहे. त्यातील क्षमता समजून घेणे गरजेचे आहे.''